दै. सकाळ २०/९/०६



कोल्हापुरात झालेल्या जिल्हास्तरीय शासकीय उच्च माध्यमिक व्हॉलीबॉल स्पर्धेतील कमला कॉलेजचा विजयी संघ. उभ्या असलेल्या शबाना पटवेगार, विमल पुजारी, कविता पाटील, योगिता दळवी आणि ज्योती काटकर. खुर्चीवर बसलेले प्रशिक्षक प्रा. सौ. साधना पाटील, प्रा. सौ. सुनीता काळे, प्राचार्य क्रांतिकुमार पाटील, दीपाली इंगळे आणि वैजयंत नलवडे. खाली बसलेल्या माधुरी चौगुले व कल्पना बागणे.

# व्हॉलीबॉल स्पर्धेत कमला कॉलेज अजिंक्य

कोल्हापूर, ता. १९ : जिल्हास्तरीय शासकीय उच्च माध्यमिक व्हॉलीबॉल स्पर्धेत येथील कमला कॉलेज संघाने अजिंक्यपद पटकावले. पंचवीस सप्टेंबरपासून येथील शिवाजी स्टेडियमवर होणाऱ्या विभागीय स्पर्धेसाठी या संघाची निवड झाली.

जिल्हास्तरीय स्पर्धेचा अंतिम सामना सोळा सप्टेंबरला येथील शिवाजी स्टेडियमवर झाला. यावेळी कमला कॉलेज संघाने अर्जुननगर (ता. कागल) येथील देवचंद कॉलेज संघावर २-१ ने विजय मिळवला.